महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१

Email id :- mscegcctbc@gmail.com फोन क्रमांक :- ०२०-२६१२३०६६/६७


**अति महत्त्वाचे**

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/आ.४(०३)/२०२२/613

दिनांक :- 10/०३/२०२२

प्रति,

**१) विभागीय शिक्षण उपसंचालक,सर्व .**

**२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,सर्व.**

**३) शिक्षण निरीक्षक,बृहन्मुंबई (उ/द/प)**

**विषय :- शासनमान्यता प्राप्त वाणिज्य टंकलेखन व लघुलेखन (जीसीसी) आणि संगणक टंकलेखन (जीसीसी-टीबीसी) व (जीसीसी-एसएसडी-सीटीसी) संस्थांच्या नुतनीकरणाबाबत.**

**संदर्भ :- १) या कार्यालयाचे जा.क्र.८७१, दि.१८/०२/२०२० रोजीचे पत्र.**

**२) या कार्यालयाचे जा.क्र.३१९६, दि.२४/११/२०२० रोजीचे पत्र.**

**३) या कार्यालयाचे जा.क्र.३२६२, दि.०३/१२/२०२० रोजीचे पत्र.**

**४) या कार्यालयाचे जा.क्र.२५०६, दि.३१/०८/२०२१ रोजीचे पत्र.**

उपरोक्त विषयी व संदर्भिय पत्रान्वये जीसीसी,जीसीसी-टीबीसी व जीसीसी-एसएसडी-सीटीसी या परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्र भरत असताना त्यासोबत संस्था नुतनीकरण आदेश अपलोड करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने सदरील मागील परीक्षांसाठी नूतनीकरणाबाबतची संदर्भिय पत्र वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये संस्थानी विद्यार्थाचे नुकसान होऊ नये व कोणतीही संस्था नुतनीकरणामुळे वंचित राहु नये म्हणुन संस्थांनी परीक्षेसाठी **आवेदनपत्र भरताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी असे कळविले होते :-**

१. ज्या संस्थांना नुतनीकरण आदेश प्राप्त झालेले आहेत अशा संस्थांनी नुतनीकरण आदेश अपलोड करावेत.

२. ज्या संस्थांनी अद्यापपर्यंत नुतनीकरण करून घेतलेले नाही. अशा संस्थांनी त्वरीत नुतनीकरणाबाबतचे प्रस्ताव आपल्या संबंधित शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) या कार्यालयांकडे सादर करावेत. त्याचप्रमाणे संबंधित कार्यालयाकडे सादर केलेल्या प्रस्तावांचा अग्रेषित पत्राची प्रत (कव्हरिंग लेटर) व त्या सोबत मागील लगतच्या वर्षाची नुतनीकरण आदेशाची प्रत परीक्षेची आवेदनपत्र भरताना अपलोड करावी.

३. ज्या संस्थांचे नुतनीकरणाचे प्रस्ताव संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) व विभागीय शिक्षण उपसंचालक या कार्यालयांकडे प्रलंबित आहेत, अशा संस्थांनी संबंधित कार्यालयाकडे सादर केलेल्या प्रस्तावांचा अग्रेषित पत्राची प्रत (कव्हरिंग लेटर) व त्या सोबत मागील लगतच्या वर्षाची नुतनीकरण आदेशाची प्रत आवेदनपत्र भरताना अपलोड करावी.

संदर्भिय पत्रांन्वये या कार्यालयास प्राप्त तक्रारीनुसार उपरोक्त प्रमाणे कळवूनसुद्धा नुतनीकरण आदेश प्रलंबित राहतात. नुतनीकरण प्राप्त नसताना देखील सदर संस्थांचे विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट होतात,असे निदर्शनास आलेले आहे. सदरील बाब ही गंभीर स्वरुपाची आहे.टंकलेखन व लघुलेखन परीक्षा आणि संगणक टायपिंग परीक्षा मान्यता व संचालन नियम १९९१ ची सुधारीत नियमावली २०१६ मधील प्रकरण २ मधील ७ मधील ७.४ नुसार नूतनीकरण देण्याचे अधिकार संबंधीत शिक्षण उपसंचालक यांना आहेत.

पुढील प्रस्तावित परीक्षा व त्यापुढील सर्व परीक्षांची आवेदनपत्रे ग्राहय धरण्यापूर्वी सर्व संस्थांनी अद्ययावत नुतनीकरण आदेशाची प्रत अपलोड करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्या स्तरावर प्रलंबित असलेल्या संस्था नुतनीकरण प्रस्तावावर कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

ज्या संस्थांचे अद्ययावत नुतनीकरण झालेले नसेल अशा संस्थांमधील विद्यार्थ्यांची प्रस्तावित परीक्षांची आवेदनपत्रे,नुतनीकरण नसल्यास ग्राहय धरण्यात येणार नाहीत. यामुळे आपल्या स्तरावरून संस्थाना प्रलंबित नुतनीकरणाचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे संबंधित विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील,याची नोंद घ्यावी.

शैलजा 7/3/2022

**(शैलजा दराडे)**

**आयुक्त**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**

**पुणे-१**

**प्रत माहितीस्तव :**

**सर्व शासनमान्य टंकलेखन/लघुलेखन व संगणक टंकलेखन संस्थाचालक, महाराष्ट्र व गोवा राज्य.**

D:\S\letter\DYD Patra.docx